| MHBU100012912024 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | - | २८/०८/२०२४ | | |
| | नोंदणी तारीख | - | २८/०८/२०२४ | | |
| | निकाल तारीख | - | २०/०८/२०२६ | | |
| | कालावधी | - | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०१ | ११ | २३ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग न्यायालय क्र.१ मलकापुर यांचे न्यायालय**
**(पीठासीन अधिकारी-अतुल उ.मोटे )**
(पारीत दिनांक २०.०८.२०२६)

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.६९५/२०२४,** **निशाणी क्र.३९**
**अप.क्र.१२९/२०२३ पोलिस स्टेशन, मलकापुर एम.आय.डी.सी.**

| | |
|---|---|
| फिर्यादी | महाराष्ट्र शासन तर्फे ,<br>पोलीस स्टेशन अधिकारी,<br>पोलीस स्टेशन मलकापुर एम.आय.डी.सी. |
| अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता | श्रीमती आर.बी. देवराज |
| आरोपी | **दिपक हंसराज चौकसे,**<br>वय – ४६ वर्ष, व्यवसाय – ड्रायव्हर<br>राह. रसुलपुर, ता.रावेर, जि. जळगांव खाँ. |
| आरोपीतर्फे विधिज्ञ | श्री.आर.एम. निकम |

**भाग -ब**

| | |
|---|---|
| पहिली खबर दिनांक | २२/०९/२०२३ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | २८/०८/२०२४ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | १८/१०/२०२४ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | २५/०७/२०२५ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | निरंक |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | १३/०८/२०२४ |
| शिक्षा दिल्याची तारीख, आदेश | निरंक |

## आरोपीचा तपशीला

| आरोपीची श्रेणी | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनवर सोडल्याची तारीख | अधिनियम | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा दिली | दिलेली शिक्षा | सुनावणीदरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ सी.आर.पी.सी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **दिपक हंसराज** | निरंक | निरंक | भा.द.वी.चे कलम २७९, | आरोपीस निर्दोष मुक्त केले | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | **चौकसे,** | | | ४२७ | | | |

**भाग -क**

**अभियोगपक्षाच्या साक्षीदारांची यादी / बचाव / न्यायालयाचे साक्षीदार**

**अ. अभियोग**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१ | निना विनायक बोरले | घटनास्थळ पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.२ | जगन्नाथ प्रल्हाद महाजन | घटनास्थळ पंच साक्षीदार |
| अ.सा.क्र.३ | पंकज गोपाल बजाज | फिर्यादी |
| अ.सा.क्र.४ | श्रीधर नारायण नरोटे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.क्र.५ | गणेश उत्तम चिमकर | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार |
| अ.सा.क्र.६ | संदिप रमेश पवार | प्राथमिक तपासी अमंलदार |
| अ.सा.क्र.७ | प्रल्हाद विश्वनाथ चोपडे | तपासी अमंलदार |

**ब. बचाव साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| डि.सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट साक्षीदार, इतर**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरुप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैदयकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सी. सा.क्र.१ | निरंक | निरंक |

**अभियोगपक्षाचे / बचाव / कोर्ट निशाणी**

**अ. अभियोग**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | १४ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| २ | १७ | घटनास्थळ पंचनाम्यावरील सही |
| ३ | १९ | तक्रार |
| ४ | २० | छापील प्रथम खबर अहवाल |
| ५ | ३४ | घटनास्थळ पंचनामा |
| ६ | ३५ | साक्षीदार क्र.०२ च्या बयाणातील अधोरेखांकित भाग अ |
| ७ | ३६ | साक्षीदार क्र.०५ च्या बयाणातीलअधोरेखांकित भाग अ |
| ८ | ३७ | साक्षीदार क्र.०४ च्या बयाणातीलअधोरेखांकित भाग अ |

**ब. बचाव**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. कोर्ट निशाणी**

| अनु. क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**ड. मुद्देमाल**

| अनु. क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(पारीत दि.२०.०८.२०२६)

आरोपी हा भारतीय दंड विधानाचे कलम २७९ व ४२७ अन्वये अपराधाकरीता सपंरीक्षेस समोर जात आहे.

**अभियोगपक्षाचे कथन-**

०२. दिनांक २२.०९.२०२३ रोजी १०.३० ते १०.४५ दरम्यान दसरखेड शिवार टोल नाका, ता.मलकापुर, जि.बुलडाणा येथे फिर्यादी हा त्याची स्कोडा कार क्रमांक एम.एच १४ पी.जी. ४०४९ ने मुक्ताईनगरकडे हायवेने जात असतांना टोल नाका येथे टोल भरणेकरीता थांबला असता मलकापुर कडुन महिंद्रा पिकअप मालवाहु गाडी क्र. एम.एच.४१ जी. ०८९२ च्या चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन हे भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीच्या कारला ठोस मारून कारच्या मागील बाजुचे बफर चिपले व दबल्याने नुकसान केले. अशाप्रकारे फिर्यादीच्या तक्रारीवरुन

आरोपी विरुध्द पोलीस स्टेशन, मलकापुर एम.आय.डी.सी. येथे अपराध क्र.१२९/२०२ हा भारतीय दंड विधान कलम २७९ व ४२७ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला. गुन्हयांच्या तपासामध्ये तपासी अमंलदार यांनी घटनास्थळ पंचनामा तयार करून साक्षीदारांचे बयान नोंदविले. तपासाअंती आरोपीविरुध्द पुरावा मिळुन आल्याने न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

**<u>दोषारोप व आरोपीचे म्हणणे-</u>**

०३. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी दोषारोपपत्राचे व कागदपत्राचे अवलोकन करून आरोपीविरुध्द निशाणी ११ प्रमाणे भारतीय दंड विधानचे कलम २७९ व ४२७ अन्वये दोषारोप निश्चीत केले. आरोपीला त्याच्या मातृभाषेत वाचुन व समजावून सांगितले, तथापी आरोपीने गुन्हा कबूल न केल्याने प्रकरणाची संपरिक्षा घेण्यात आली. आरोपीविरुध्द गुंन्हयात गोवण्याइतपत पुरावा अभिलेखावर आला असल्यामुळे आरोपीचे कलम ३१३ फौजदारी प्रक्रिया संहिते नुसार नि.क्र.३७ प्रमाणे नोंदविण्यात आले. त्यामध्ये आरोपीने खोटी केस केल्याचा बचाव घेतला.

**<u>मुद्दे व निष्कर्ष</u>**

०४. अभिलेखावरील पुरावा आणि दोन्ही पक्षाचे युक्तीवादानंतर खालील विचारार्थ मुद्दे उद्भवतात व त्यावरील माझे निष्कर्ष खालील कारणमिमांसेच्या आधारे देत आहे.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | दि.२२.०९.२०२३ रोजी सकाळी १०.३० ते १०.४५ वाजताचे सुमारास दसरखेड शिवार टोल नाका ता. मलकापुर, जि. बुलढाणा येथे आरोपीने पिकअप क्र.एम.एच.४१.जी. ०८९२ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी यांच्या स्कोडा कार क्रमांक एम.एच १४ पी.जी. ४०४९ हिला मागुन धडक दिली आणि त्याअन्वये आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम २७९ अन्वये गुन्हा केला, असे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| २ | उपरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने फिर्यादीचे स्कोडा कार क्रमांक एम.एच १४ पी.जी. ४०४९ ला मागुन धडक देवुन त्यांच्या स्कोडा कारचे अंदाजे ५०/- रूपया पेक्षा जास्त नुकसान केले आणि त्याअन्वये तुम्ही आरोपीने भारतीय दंड विधानाचे कलम ४२७ अन्वये गुन्हा केला, अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| ३ | काय आदेश | **अंतिम आदेशाप्रमाणे** |

## कारणमिमांसा

०५. दोन्ही पक्षाचा युक्तीवाद ऐकला. मुद्दा क्रमांक १ व २ हे एकमेकांशी निगडीत आहे. त्यामुळे त्यांची पुनःरावृत्ती टाळण्याकरीता त्याचे कारण एकत्रीत रित्या देत आहे.

०६. प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द ठेवलेले आरोप सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने एकुण सात साक्षीदार तपासले आहेत. घटनास्थळ पंच निना विनायक बोरले यांना (सा.क्र.१) म्हणुन नि.क्रं.१३ प्रमाणे, घटनास्थळ पंच जगन्नाथ प्रल्हाद महाजन यांना (सा.क्र.०२) म्हणुन नि.क्र.१६ प्रमाणे, फिर्यादी पंकज गोपाल बजाज यांना (सा.क्र.०३) म्हणुन नि.क्र.१८ प्रमाणे, साक्षीदार श्रीधर नारायण नरोटे यांना (सा.क्र.०४) म्हणुन नि.क्र.२३ प्रमाणे, साक्षीदार गणेश उत्तम चिमकर यांना (सा.क्र.०५) म्हणुन नि.क्र.२६ प्रमाणे, संदीप रमेश पवार यांना (सा.क्र.०६) म्हणुन नि.क्र.३० प्रमाणे, तर तपासी अमंलदार प्रल्हाद विश्वनाथ चोपडे यांना (सा.क्र.०७) म्हणुन नि.क्र.३३ प्रमाणे तपासले आहेत. त्याचप्रमाणे नि.क्र.१ वर आदेश पारीत करुन अभियोगपक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

### मुद्दा क्रमांक १ व २ ची कारणे-

०७. साक्षीदार क्र.३ हे घटनेचे फिर्यादी असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, घटना ही दि.२२.०९.२०२३ रोजी सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास दसरखेड टोलनाक्याजवळ घडली होती. त्यादिवशी ते त्यांच्या मुलीला घेवून जळगाव येथे जात होते. त्यावेळी ते दसरखेड टोलनाक्यावर असतांना पाठीमागुन गाडी क्र. एम एच ४१ जी-०८९२ या क्रमांकाचे वाहन आले व त्या वाहनाने वेगाने येवून त्यांचे स्कोडा गाडी क्र.एम एच १४ एफ जी-४०४९ चे कंडक्टर साईडने धडक दिली. पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांना ज्या वाहनाने धडक दिली होती त्या वाहनाच्या चालकाला आवाज दिला असता तो निघुन गेला. त्यानंतर त्यांनी गाडीखाली उतरून पाहिले असता त्यांचे गाडीचे बंपर साईडने तुटले होते. त्यानंतर त्यांनी टोलनाक्यावर सी.सी.टी.व्ही फुटेज पाहुन गाडी क्रमांक घेतला व त्याचेविरूध्द पोलिस स्टेशनला **नि.क्र.१९** प्रमाणे तक्रार दिली. पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सदर धडकेमुळे त्यांचे वाहनाचे वीस ते पंचवीस हजाराचे नुकसान झाले होते. छापील तक्रार व प्रथम खबर अहवालावर त्यांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर असल्याचे त्यांनी सांगितले. त्यानंतर त्यांनी पोलिसांना घटनास्थळ दाखविले होते. पुढे त्यांच्या पुराव्यात असे आले आहे की, ज्या गाडीने त्यांचे गाडीला धडक दिली होती त्या गाडी चालकास ते ओळखतात. उलटतपासात साक्षीदार क्र.३ ने मान्य केले

आहे की, दसरखेड येथे टोलनाका असल्यामुळे कोणतेही वाहन तेथे थांबते व टोलनाक्याजवळ गतीरोधक असतात. गतीरोधक तसेच टोलनाका असल्यामुळे कोणतेही वाहन तेथुन वेगाने जात नाही. उलटतपासात त्यांनी हेही मान्य केले आहे की, धडक दिल्यानंतर ते पोलीस स्टेशनला तक्रार देण्याकरिता त्वरित गेले नाही. तक्रारनुसार घटना ही सकाळी १०.३० वाजता झाली व त्यांनी तक्रार संध्याकाळी ०५.१५ वाजता दिली.

०८. सा.क्र.१ व सा.क्र.२ हे घटनास्थळ पंच असुन त्यांनी त्यांचे पुराव्यात अभियोगपक्षाच्या प्रकरणास कोणतेही सहकार्य केले नाही. सा.क्र.०१ व ०२ यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की, त्यांना पोलिसांनी दि.२२.०९.२०२३ रोजी घटनास्थळ पंचनाम्याकरिता दसरखेड येथील टोलनाक्याजवळ बोलावले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष घटनास्थळ पंचनामा तयार केला नाही. तसेच घटनास्थळ पंचनाम्यावर त्यांची अनुक्रमांक ०१ व ०२ वर सही असून त्यातील मजकुर माहित नसल्याचे सांगितले आहे. सा.क्र.०१ व सा.क्र.०२ यांनी अभियोगपक्षाचे प्रकरणास सहकार्य केले नसल्याने विदवान सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीनुसार साक्षदारास फितुर घोषित करुन उलट तपासणीच्या स्वरुपात सुचक प्रश्न विचारुन देखील सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. याउलट, साक्षीदार क्र.२ ने त्यांचे बयानातील अधारेखांकित भाग अ पोलिसांना सांगितला नसल्याचे अभिलेखावर आले आहे. साक्षीदार क्र.१ व सा.क्र.२ यांनी अभियोगपक्षाला सहकार्य केले नसल्यामुळे प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्यास सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षास उपयोगी ठरत नाही.

०९. सा.क्र.४ व सा.क्र.५ हे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असुन त्यांनी त्यांचे पुराव्यात अभियोगपक्षाच्या प्रकरणास कोणतेही सहकार्य केले नाही. सा.क्र.४ व सा.क्र.५ यांनी त्यांच्या पुराव्यात कथन केले आहे की, आरोपीला ते ओळखत नाही. घटना कधी, केव्हा घडली होती हे त्यांना माहित नाही. पोलिसांनी त्यांचेकडे चौकशी करून त्यांचा जबाब नोंदविला नव्हता. सा.क्र.०४ व सा.क्र.०५ यांनी अभियोगपक्षाचे प्रकरणास सहकार्य केले नसल्याने विदवान सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीनुसार साक्षदारास फितुर घोषित करुन उलट तपासणीच्या स्वरुपात सुचक प्रश्न विचारुन देखील सबळ पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. याउलट, सा.क्र.०४ व सा.क्र.०५ यांनी त्यांचे बयानातील अधारेखांकित भाग अ पोलिसांना सांगितला नसल्याचे अभिलेखावर आले आहे.

१०. साक्षीदार क्र.०७ हे तपासी अंमलदार असुन त्यांचा पुरावा हा प्रामुख्याने त्यांच्या

कर्तव्याशी निगडीत असुन त्यांनी नि.क्र.३४ प्रमाणे घटनास्थळ पंचनामा तयार केल्याचे तसेच साक्षीदाराचे बयान नोंदविले असल्याचे कथन केले आहे. त्याचप्रमाणे सा.क्र.०६ यांनी सा.क्र.०७ हे सेवानिवृत्त झाल्यामुळे आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केल्याचे कथन केले आहे. सा.क्र.०७ ने उलटतपासात मान्य केले आहे की, घटनास्थळावरील टोलनाक्यावर जाणे-येण्याचे रस्त्यावर गतिरोधक आहेत. त्यामुळे तेथे वाहन हे वेगाने जात नाही.

११. एकंदरीत अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, फिर्यादी शिवाय अभियोगपक्षा मार्फत तपासण्यात आलेले इतर साक्षीदार यांनी अभियोगपक्षाच्या बाजुने पुरावा दिलेला नाही. त्यामुळे फिर्यादीचा पुरावा सोडुन अभिलेखावर इतर प्रत्यक्षदर्शी पुरावा उपलब्ध नाही. फिर्यादी यांनी त्यांच्या सरतपासात तथाकथित घटनेनंतर वाहनाच्या चालकाला आवाज दिला असता तो निघुन गेला, तसेच गाडी खाली उतरून पाहिले असता बंफर तुटलेले होते, तसेच त्यांनी टोलनाक्यावरील सी.सी.टिव्ही फोटेज पाहुन गाडी क्रमांक घेतला व पोलीस स्टेशनला तक्रार दिली. तसेच जवळपास त्यांच्या गाडीचे वीस ते पंचवीस हजार रूपयांचे नुकसान झाले होते. तसेच ते त्यांच्या मुलीला घेवुन जळगांव येथे जात असल्याचे कथन केले आहे. फिर्यादीच्या पुराव्यानुसार सदर बाबी या त्यांनी पोलीसांना तक्रार व बयान देतेवेळी सांगितल्या असल्याचे कथन केले आहे. यावरून असे दिसुन येते की, सा.क्र.०३ ने तथाकथित घटनेनंतर वाहनाच्या चालकाला आवाज दिला असता तो निघुन गेला, तसेच गाडी खाली उतरून पाहिले असता बंफर तुटलेले होते, तसेच त्यांनी टोलनाक्यावरील सी.सी.टिव्ही फोटेज पाहुन गाडी क्रमांक घेतला व पोलीस स्टेशनला तक्रार दिली. तसेच जवळपास त्यांच्या गाडीचे वीस ते पंचवीस हजार रूपयांचे नुकसान झाले होते. तसेच ते त्यांच्या मुलीला घेवुन जळगांव येथे जात होते या बाबी पहिल्यांदाच न्यायालयात कथन करीत आहे हे स्पष्ट दिसुन येते. त्यामुळे अशा परिस्थितीत घटना घडली होती किंवा नाही हे संशयास्पद वाटते. त्यामुळे अभिलेखावर फिर्यादीचा सबळ पुरावा अथवा फिर्यादी सहीत तपासण्यात आलेल्या इतर प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचा सबळ पुरावा येणे अपेक्षित आहे. अभिलेखाचे अवलोकन केले असता फिर्यादी सोडुन तपासण्यात आलेल्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराचा पुरावा अभियोगपक्षास उपयुक्त असल्याचे दिसुन येत नाही. तसेच फिर्यादीचा पुरावा हा देखील सबळ असल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे एकुणच अभियोगपक्षाच्या कथनावर संशय निर्माण होतो. तसेच फिर्यादी साक्षीदार क्र.३ यांच्या साक्षीपुराव्यास दुजोरा देणारा इतर कोणताही दुसरा पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे साक्षीदार क्र.३ ची साक्ष अभियोगपक्षास आरोपीविरूध्द गुन्हा

शाबीत होईल इतपत पुरेशी नाही. त्यामुळे वरील सर्व बाबी लक्षात घेवुन तथाकथित नमुद घटना तारखेस, वेळी व ठिकाणी आरोपीने भरधाव वेगाने व निष्काजीपणे त्यांच्या ताब्यातील वाहन पिकअप क्र.एम.एच.४१.जी. ०८९२ ही भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन फिर्यादी यांच्या स्कोडा कार क्रमांक एम.एच १४ पी.जी. ४०४९ हिला मागुन धडक दिली. तसेच स्कोडा कारचे अंदाजे ५०/- रूपया पेक्षा जास्त नुकसान केले. हे अभियोगपक्षाने नि:संशयापलिकडे सिध्द केले नाही. त्यामुळे आरोपीविरूध्द सबळ असा पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे त्याला त्याच्यावर ठेवण्यात आलेल्या आरोपातुन निर्दोष मुक्त करणे आवश्यक आहे. सबब, मुददे क्र. १ व २ यास नकारार्थी उत्तर देण्यात येत आहे.

**मुद्दा क्रमांक ३ चे कारण -**

१२. वरील मुद्दा क्रमांक १ व २ चे आलेल्या निष्कर्षावरुन आरोपी हा निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. त्याचप्रमाणे आरोपीने कलम ४३७-अ फौ.प्र.सं.अंतर्गत तुरतुदीनुसार पुढील सहा महिण्याच्या कालावधीकरीता जामीन देणे आवश्यक आहे. सबब, मुद्दा क्रमांक ३ च्या अनुषंगाने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

| | |
|---|---|
| १. | आरोपी **दिपक हंसराज चौकसे** यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड विधानचे कलम २७९ व ४२७ शिक्षेस पात्र अपराधाच्या आरोपातुन निर्दोषमुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपीचा जातमुचलका व जामीन कदबा रदद करण्यात येत आहे. |
| ३. | आरोपीने फौजदारी प्रक्रिंया संहितेचे कलम ४३७-अ च्या अनुपालनास्तव रु.१५,०००/-चा वैयक्तीक बंधपत्र व जामीनकदबा पुढील सहा महिण्याच्या कालावधीकरीता दाखल करावा. |
| | **(**न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.**)** |

ATUL UTTAMRAO MOTE
Digitally signed by ATUL UTTAMRAO MOTE
Date: 2026.08.20 18:22:24 +0530

**(अतुल उ.मोटे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
न्यायालय क्र- १, मलकापूर

दि. २०/०८/२०२६
मलकापूर

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी अशी खात्री देतो की, सदर पी. डी.एफ. फाईलमधील मजकूर मुळ न्यायनिर्णयाप्रमाणे प्रत्येक शब्द बरोबर आहेतः-

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग (न्या.क्र. ०१) मलकापूर, |
| पिठासीन अधिकारी | | अतुल उ.मोटे |
| लघुलेखकाचे नाव | : | जी.पी.खरात, (लघुलेखक-३) |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | २०/०८/२०२६. |
| न्यायनिर्णय स्वाक्षरीत केल्याचा दिनांक | : | २०/०८/२०२६. |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | २०/०८/२०२६. |